संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# एका 'न्याय'पूर्ण चर्चेला विराम

**सर्वोच्च** न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती रंजन गोगाई यांच्याविरुध्द एका महिलेने केलेल्या आरोपांची चौकशी पूर्ण झाली आणि ही चौकशी करणाऱ्या समितीने मुख्य न्यायमूर्तींना निर्दोष ठरवले आहे. दोन महिला न्यायमूर्तींसह सर्वोच्च न्यायालयाचेच न्यायमूर्ती एस. ए. बोबडे या समितीने गोगाई यांच्यावरच्या आरोपाची शहानिशा करण्याचा प्रयत्न केला. इन कॅमेरा चाललेल्या या चौकशीचा तपशील बाहेर येणार नाही. परंतु चौकशीअंती न्यायालयातून बडतर्फ केलेल्या सदर महिलेने सूडापोटी गोगाई यांच्यावर आरोप केल्याचा निष्कर्ष या समितीने काढलेला दिसतो. रंजन गोगाई हे या देशाच्या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषवित आहेत. त्यांच्याविरुध्द जेव्हा आरोप झाला त्यावेळी स्वतः त्यांनीच न्याय व्यवस्था खिळखिळी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होत असल्याची भावना व्यक्त केली होती. स्वतःवर झालेल्या आरोपाचा इन्कार तर त्यांनी केला. परंतु मुख्य न्यायमूर्तीपदी विराजमान झाल्यानंतर अचानकपणे एक महिला येते आणि गोगाई यांच्याविरुध्द आरोप करते. हा सगळाच भाग तसा संशयास्पद किंवा विश्वासार्ह वाटत नव्हता. तरीदेखील आपल्या देशात लोकशाही व्यवस्था आहे. आणि प्रत्येकाला न्याय मिळवण्याची पूर्णपणे मुभा दिलेली आहे. अशा परिस्थितीत त्या महिलेने आरोप केल्यानंतर त्याची स्वतंत्र चौकशी करण्याची घोषणा स्वतः गोगाई यांनी केली. त्या महिलेला आपले म्हणणे मांडण्याचीही सोय उपलब्ध करून दिली. समितीसमोर मांडली गेलेली भूमिका आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचा अभ्यास या समितीने केलेला दिसतो. परिणामतः देशाच्या सर्वोच्च न्यायमूर्तींच्या विरोधातला हा आरोप फार दिवस चर्चेत ठेवता येत नव्हता. कारण त्यातून केवळ न्यायमूर्तींची बदनामी होते असे नाही, तर ते मुख्य न्यायमूर्ती असल्यामुळे एकूणच न्यायव्यवस्थेविषयी लोकांच्या मनामध्ये संभ्रम कायम राहू शकतो. कदाचित म्हणूनच कोणताही विलंब न लावता आरोप झाल्यानंतर पुढच्या दोनच दिवसात समिती नेमण्याची घोषणा झाली आणि त्याच्या पुढच्या पंधरा दिवसात समितीने हा विषय हातावेगळा केला. एका चर्चेला न्यायपूर्ण विराम दिला गेला असे त्याचे वर्णन करावे लागेल. स्वाभाविकपणे संबंधित महिलेने समितीच्या निष्कर्षावर टीका केलेली आहे.

### व्यक्ती नव्हे पद

भारतात लोकशाहीचे जे काही चार स्तंभ मानले जातात त्यात न्यायव्यवस्थेविषयी जनतेच्या मनामध्ये अजूनही सर्वाधिक आदर पाहायला मिळतो किंबहुना न्यायव्यवस्थेविषयी विशिष्ट धाक असल्याचेही जाणवते. संसद, कार्यपालिका किंवा प्रसार माध्यमे याच्याविषयी सामान्य जनतेमध्ये जितका विश्वास नाही तितका न्यायव्यवस्थेविषयी आहे हे मान्य केले पाहिजे. अशावेळी न्यायव्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि न्याय या संकल्पनेला समृध्द करणारी असावी यात काही शंका नाही. परंतु गेल्या काही वर्षात न्यायव्यवस्थेविषयी ज्या काही घटना घडल्या. उच्च न्यायालयाच्या अनेक न्यायमूर्तींविरुध्द भ्रष्टाचाराचे गैरकारभाराचे आरोप झाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर लोकांच्या मनामध्ये न्यायव्यवस्थेविषयी असलेली आदराची भावना दिवसेंदिवस कमी होत गेली. आणि आता तर थेट मुख्य न्यायमूर्तींविरुध्दच एका अर्थी चारित्र्यहननाचा आरोप झाला. लोकशाहीतला चौथा स्तंभ म्हणून आपण ज्या प्रसार माध्यमाचा उपयोग करतो त्यातल्या अगदी ज्येष्ठ पत्रकारांविरुध्दसुध्दा आरोप झाले. मनोरंजन क्षेत्र तर अशा व्यवहारांविषयी प्रसिध्दच मानले जाते. अनेक वर्षे गप्प असलेल्या महिलांनी 'मी टू' या मोहिमेच्या अंतर्गत काही वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांचा संदर्भ देत आरोप केले. त्यामध्ये एम. जे. अकबर या केंद्रीय मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. गेल्या वर्षी या मी टू मोहिमेने संपूर्ण देशभर चांगलाच धुमाकूळ घातला होता आणि तशाच पध्दतीचे लोण न्यायक्षेत्रातही पोहचते की काय अशी शक्यता वाटत होती. गोगाईंवरचा आरोप हा त्याच पठडीतला नाही ना अशी देखील शंका अनेकांना आली होती. परंतु ज्या वेगाने आणि अतिशय व्यथित मानसिकतेतून गोगाई यांनी स्वतःच्या संदर्भातले चौकशीचे आदेश दिले. ते पाहिल्यावर क्षीर, नीर विवेकाप्रमाणे दूध का दूध और पानी का पानी हे लवकरात लवकर सिध्द करण्याचा हेतू दिसून आला. समितीपुढे नेमके काय पुरावे आले. संबंधित महिलेने मांडलेल्या भूमिकेचे कोणते संदर्भ तपासले गेले. या संपूर्ण गोष्टी प्रकाशात येतीलच असे नाही. परंतु ही गोपनीयता खरोखर कितपत आवश्यक आहे यावरही मोठी चर्चा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न

राहाता राहिला प्रश्न तो न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचा. ही गोष्ट खरीच आहे की आपल्या देशात त्या व्यक्तीपेक्षा पदाला अधिक महत्त्व असते. किंबहुना त्या पदामुळे त्या व्यक्तीची प्रतिष्ठा वाढत असते आणि म्हणूनच त्या पदाचा योग्य तो सन्मान राहील म्हणून संबंधित व्यक्तीने आपली प्रतिष्ठा सांभाळण्याचा प्रयत्न करायचा असतो. गोगाईंबाबत घडलेली ही घटना जवळपास वर्षभर जुनी होती. ते मुख्य न्यायमूर्ती असताना हा विषय समोर का आला नाही अशी कोणालाही शंका येऊ शकते. ते मुख्य न्यायमूर्ती झाल्यानंतरच हे प्रकरण पुढे आल्याने याठिकाणी गोगाई या व्यक्तीपेक्षाही मुख्य न्यायमूर्ती हे पद लक्ष्य केले गेले की काय असाही प्रश्न उपस्थित होतो. या व्यथेतूनच गोगाई यांनी त्यांच्यावर आरोप झाल्यानंतर न्यायव्यवस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याची खंत जाणीवपूर्वक केली होती. काही विरोधकांच्यादृष्टीने गोगाई यांनी या चौकशीचा निष्कर्ष येईपर्यंत आपल्या पदापासून दूर जावे अशा प्रकारचे मत व्यक्त केले होते. तेही गोगाई यांना करता आले असते. परंतु त्यांच्यादृष्टीने या आरोपात अजिबात तथ्य नसल्याने त्याला एवढे महत्त्व द्यायचे की नाही असा प्रश्न होता. कारण केवळ काही विशिष्ट हेतू ठेवून जर हा प्रकार घडवून आणला गेला असेल तर नेमके कशाचे उदात्तीकरण करायचे आणि या एका कारणासाठी सर्वोच्च न्यायमूर्ती या पदासोबतच संपूर्ण न्यायव्यवस्थेला वेठीला धरू द्यायचे का असेही काही मूलभूत प्रश्न उपस्थित झाले होते.